# शेंदरी बोंडअळी नियंत्रणासाठी करावयाच्या उपाययोजना

| | |
|---|---|
| <u>२ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०१८</u><br><br>**पीक वाढीच्या अवस्थाः**<br>पेरणीनंतर ७५-१०५ दिवसांपर्यंत (फुले, पाते, बोंडे तयार होण्याची अवस्था) | • पिक फुलोरा अवस्थेत असल्यापासून प्रती एकरी २ कामगंध सापळे बसवून सतत निरीक्षणे करावीत.<br>• कामगंध सापळयातील वडी (ल्यूर) त्याच्या वैधता तारखेप्रमाणे बदलावी.<br>• कामगंध सापळयात अडकलेले पतंग प्रत्येक आठवडयाला बाहेर काढून नष्ट करावेत.<br>• जर किडीने आर्थिक नुकसान पातळी ओलांडली असेल (म्हणजेच सर्वसाधारण नर पतंग ८ प्रती सापळा सलग ३ दिवस सापडल्यास) मास ट्रॅपींगसाठी जास्तीचे ६ कामगंध सापळे प्रती एकरी लावावेत.<br>• प्रती एकर (रॅन्डमली) २० हिरवी बोंडे घेवून (एक बोंड प्रती झाड) त्याचा काप घेवून पहाणी करावी. १० % प्रादुर्भावग्रस्त फुले किंवा बोंडात जिवंत अळया आढळल्यास क्विनॉलफॉस २५% एएफ २० मिली किंवा थायोडीकार्ब ७५% डब्ल्यूपी २० ग्रॅम/प्रती १० लिटर पाणी घेवून फवारणी करावी.<br>• १० ते १५ दिवसाच्या अंतराने क्लोरोपायरीफॉस २० % ईसी २५ मिली किंवा थायोडीकार्ब ७५ डब्ल्यूपी २० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी घेवून फवारणी करावी.<br>• उपलब्धता असल्यास सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात किंवा ऑक्टोंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात परजीवी ट्रायकोग्रामा बॅक्टरी ६०००० अंडी प्रती एकर प्रमाणे वापर करावा.<br>• साधारणपणे एका ट्रायकोकार्डवर ५००० - १८००० ट्रायकोग्रामा बॅक्टरी अंडी असतात.<br>• ट्रायकोकार्ड लावल्यानंतर साधारणपणे १० दिवस किटकनाशकांची फवारणी टाळावी. |
| <u>१ ऑक्टोंबर ते ३० ऑक्टोंबर २०१८</u><br><br>**पीक वाढीच्या अवस्थाः**<br>१०५-१३५ बोंडे भरणे, बोंडे फुटणे | • सप्टेंबरच्या शेवटच्या आठवडयात ट्रायकोकार्ड लावलेले नसतील तर चार ट्रायकोकार्ड प्रती एकरी लावावेत.<br>• प्रती एकरातील रॅन्डमली २० हिरवी बोंडे घेवून शेंदरी बोंडअळीची निरीक्षणे घ्यावीत.<br>• किड आर्थिक नुकसान पातळीच्या वर (कामगंध सापळे किंवा हिरवी बोंडे पाहिल्यानंतर) गेलेली असेल तर लगेच फेन्वलरेट २० % ईसी १० मिली किंवा सायपरमेथ्रिन १०% ईसी १० मिली प्रती १० लिटर पाणी घेवून फवारणी करावी. |

| | |
|---|---|
| १ नोव्हेंबर २०१८ ते १५ जानेवारी २०१९<br>**पीक वाढीच्या अवस्थाः**<br>१८०-२१० बोंड फुटणे, वेचणी | • शेवटची वेचणी करुन वेचणी झालेल्या शेतात चरण्यासाठी मोकळी जनावरे सोडावीत.<br>• पाण्याची उपलब्धता असेल तर उन्हाळी पिकाची फेरपालट करावी. |